


# साप्ताहिक किंमत सनियंत्रण अहवाल

## ०२.०६.२०२५

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)


The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)


**१. मका** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# मका साप्ताहिक किंमती

## दि. ०१ जून २०२५ अखेर : ₹ २०३० / क्विंटल







- मागील आठवड्यात नांदगाव बाजारात मक्याची किंमत रु. २०३० प्रती क्विंटल होती.
- मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये वाढ झाली आहे.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. २४०० प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- सध्या मक्याच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा कमी आहेत.
- मागील आठवड्याच्या तुलनेत मक्याच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे १७.९३% व ११.५८ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमळनेर बाजारात मक्याची सरासरी किंमत सर्वाधिक रु. २०८७/ क्विंटल होती, तर छ. संभाजीनगर बाजारात सर्वात कमी किंमत रु. १८६८/ क्विंटल होती.


**Source : Agmarknet**


२. **हरभरा** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# हरभऱ्याच्या साप्ताहिक किंमती

## दि. १ जुन २०२५ अखेर: रु. ५२००/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात हरभऱ्याची सरासरी किंमत रु. ५२०० प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत हरभऱ्याच्या किंमती ५.५% कमी झाल्याचे दिसून येत आहे.

रबी हंगाम २०२४-२५ साठी हरभऱ्याची किमान आधारभूत किंमत रु. ५६५० प्रति क्विं. आहे


मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर हरभऱ्याच्या आवकेमध्ये १ % घट झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमरावती बाजारात हरभऱ्याच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ५४३० /क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या. (रु.५१५४/क्विंटल).


## ३. तूर (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

# तुरीच्या साप्ताहिक किंमती

## दि. ०१ जन २०२५ अखेर: रु. ६६१०/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात तुरीच्या सरासरी किंमती रु. ६६१० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत २.१ % नी घट झाल्याचे दिसून येत आहे

सध्याच्या किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत. तुरीचा खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७५५० प्रति क्विं. आहे . तसेच खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.८००० प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे.


मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर तुरीच्या आवकेमध्ये ९.३५ % वाढ झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमरावती बाजारात तुरीच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ६७३२ /क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ६१५६ /क्विंटल).


## ४. **सोयाबीन** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)

**सोयाबीन साप्ताहिक किंमती**
**दि. ०१ जून २०२५ अखेर : रु. ४२३३ प्रती क्विंटल**






Source: Agmarknet

- मागील आठवड्यात लातूर बाजारात सोयाबीनची सरासरी किंमत रु. ४२३३ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत २.१ % घट झाली आहे.

- सोयाबीनची खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु.४८९२ प्रती क्विटल आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.५३२८ प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे. सध्या लातूर बाजारात सोयाबीनच्या किंमती या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत.


मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबींनच्या आवकमध्ये राष्ट्रीय पातळीवर ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी वाशीम बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ४६९५.८ /क्विंटल.) तर इंदोर (म. प्र.) बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ४०४७.५/क्विंटल).

## ५. कापूस (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


### कापसाच्या साप्ताहिक किंमती
### दि. ०१ जून २०२५ अखेर : रु. ७,३७१/- क्विंटल






- कापसाच्या राजकोट बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. ७३७१ प्रती क्विंटल होत्या.
- या आठवड्यातील कापसाच्या किंमतीमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत ०.३२ टक्के घट झाली आहे.
- सध्या कापसाच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा जास्त आहेत.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७७१० (मध्यम धागा) प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत कापसाच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे २०.९७ % व १५.४१ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमरावती बाजारात कापसाच्या सरासरी किंमत सर्वाधिक रु. ७८१२ / क्विंटल होती, तर हिंगणघाट (वर्धा) बाजारात सर्वात कमी किंमत रु. ७३४३ / क्विंटल होती.





Source - Agmarknet


## ६. कांदा (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# कांद्याच्या साप्ताहिक किमती

दि. ०१ जुन २०२५ अखेर: रु. १३५१/-क्विंटल






-कांद्याची लासलगाव बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. १३५१ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतींत १६ टक्केनी वाढ झाली आहे.

-देशपातळीवरव राज्यात कांद्याच्या आवकमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत २९ % नी वाढ झाली आहे.

-मागील आठवड्यात पिंपळगाव बाजारात कांद्याच्या किंमती ( रु. १४६७/क्वि.) सर्वाधिक होत्या, तर पुणे बाजारात कांद्याच्या किंमती रु. १०६०/क्वि. इतक्या होत्या.


Source: Agmarkent


७. **टोमॅटो** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


# टोमॅटो साप्ताहिक किंमती

दि. ०१ जून २०२५ अखेर : रु. २१४०/क्विंटल






- टोमॅटोच्या पुणे बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु.२१४० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीमध्ये १५ टक्केनी वाढ झाली आहे.

- देशपातळीवर मागील आठवड्याच्या तुलनेत टोमॅटोच्या आवक मध्ये २९.७ टक्केनी वाढ झाली आहे.

- प्रमुख APMC बाजारापैकी पुणे बाजारात सर्वाधिक किंमती ( रु.२१४०/क्वि.) होत्या तर संगमनेर बाजारात सर्वात कमी किंमती ( रु.१००४/ क्वि.) होत्या.


Source: Agmarknet


८. **हळद** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://rb.gy/hzx5xl)


## हळदीच्या साप्ताहिक किंमती

## दि. ०१ जून २०२५ अखेर : ₹ . ११,९२८ / क्विंटल






- मागील आठवड्यात हिंगोली बाजारात हळदीची किंमत रु. ११९२८ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये घट झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत हळदीच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे ४०.७६ % व ४८.७२ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी सांगली बाजारात हळदीची सरासरी किंमत सर्वाधिक रु. १३१५० / क्विंटल होती, तर रिसोड बाजारात सर्वात कमी किंमत रु. ११४०० / क्विंटल होती.
- २०२४ ते २०३१ या अंदाज कालावधीत जागतिक हळदीची बाजारपेठ लक्षणीय दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
- सन २०२३-२४ मध्ये हळदीचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये महाराष्ट्र राज्य भारतामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम हे हळदीची लागवड करणारे प्रमुख जिल्हे आहेत.

(स्रोत - हळद आउटलुक - अहवाल)

**Source - Agmarknet**

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

**हा QR कोड स्कॅन करून**

**व्हॉट्सॲपवर कनेक्ट व्हा**

**लिंक - https://shorturl.at/jOYAM**

---


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,

सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

**फोन** : **020-25656577**, **टोल फ्री क्रमांक**: **1800-210-1770**

**ई-मेल** : market.intelligence.smart@gmail.com

**वेबसाईट :** smart-mh.org